# शुध्दीपत्रक

कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर यांच्या निविदा क्र. १३६१ करीता पुढील प्रमाणे कागदपत्रे निविदे सोबत ऑनलाईन सादर करणे बंधनकारक राहील.

१) निविदा रकमेच्या किमान ५० टक्के किमतीचे एक काम पुर्ण झाल्याचा दाखला.
२) पी.एफ. नोंदणी व पी.एफ. भरल्याच्या पावत्या
३) व्हॅट रिर्टन
४) सोबत जोडलेले प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या मुद्रांकावर (नोटरी केलेले)
५) निविदे सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे निविदा पुर्व बैठकीच्या दिवशी मुळ कागदपत्रे सादर करुन तपासणी करुन कागदपत्रे बरोबर असल्याचा तपासणी अहवाल ऑनलाईन अपलोड करणे.

निविदे सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे ही प्रत्येक कागदपत्रावर डिजीटल स्वाक्षरी करुनच अपलोड करावीत. डिजीटल स्वाक्षरी नसलेली कागदपत्रे ग्राह्या धरली जाणार नाहीत. तसेच सर्व अपलोड कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉपी बंद लिफाफ्यात निविदा उघडण्यापुर्वी समक्ष कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

वरील पैकी कोणत्याही कागदपत्राची पुर्तता नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती
संगमनेर, जि. अहमदनगर

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती
संगमनेर, जि. अहमदनगर

# कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर

दि. ०३/११/२०१६

**शुध्दीपत्रक क्र. १**

कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर यांच्या ई निविदा क्र. १३६१ करीता निविदे मधील नियमावीलत पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत त्या नुसार निविदा अपलोड करतांना पुर्तता करुनच निविदा ऑनलाईन सादर करावी अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

१) ऑनलाईन निविदा भरतांना लिफाफा क्र. १ मध्ये स्वसाक्षांकीत निविदा फॉर्म पी.डी.एफ. स्वरुपात अपलोड करणे बंधनकारक राहील.

२) निविदे सोबत जोडलेली सर्व कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती व कागदपत्रे तपासणी अहवाल प्रत निविदा उघडण्यापुर्वी कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर यांच्या कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहील.

३) सदरील निविदा प्रक्रीये दरम्यान निविदेमधील नियमावलीत कोणतेही बदल झाल्यास सदरील शुध्दीपत्रके फक्त ऑनलाईनच प्रसिध्द करणेत येतील व निविदाधारकांनी सदरील शुध्दीपत्रके ऑनलाईन संबधीत निविदा वेबसाईटवरुन डाउनलोड करुन त्यानुसार पुर्तता करुन देणे बंधनकारक राहील.

४) तांत्रिक दृष्टया कोणत्याही निविदा धारकास निविदा भरतांना अडचन आल्यास व निविदा अपुर्ण सादर झाल्यास, ईटरनेट कनेक्शन बंद झाल्यास, सर्व्हर डाउन झाल्यास कृषि उत्पन्न बाजार समिती जबाबदार नसेल अशा वेळेस अर्धवट सादर झालेल्या कोणत्याही निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाहीत व त्या बाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

५) सदरील निविदे बाबत च्या सर्व कायदेशीर बाबी या फक्त संगमनेर न्यायालयीन कक्षेत राहतील.

६) सदरील निविदा निविदाधारक जर कमी दरात निविदा भरत असेल तर जीतकी कमी दराची निविदा असेल त्या रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा डि.डि. निविदे सोबत जोडणे बंधनकारक राहील. सदरील डि.डि. हा लिफाफा क्र. २ मध्ये अपलोड करावा जर सदरील डि.डि. योग्य रकमेचा नसेल तर सदरील निविदा ग्राह्य धरली जाणार नाही व त्या पुढील योग्य दराची व योग्य रकमेचा डि. डि. असलेली निविदा ग्राह्य धरली जाईल. (उदा. निविदा जर ४ टक्के कमी दराची असेल तर डि.डि. हा निविदा एकुण रकमेच्या ४ टक्के दराचा असावा)

७) निविदा धारकाणे जर निविदा १ टक्के पेक्षा कमी दराची भरली असेल तर १०० रु च्या मुद्रांकावर सदरील काम दर्जेदार व वेळेत पुर्ण करणार असल्याचे नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र निविदेच्या लिफाफा क्र, १ सोबत जोडावे.

८) सदरील निविदे करीता निविदा धारकाणे जर कागपत्रे ऑनलाईन सादर केलेली नसतील व एनवेळी कागदपत्रे ऑफलाईन सादर करण्याचा आग्रह धरल्यास सदरील कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत. सर्व कागदपत्रे ऑनलाईन जोडणे बंधनकारक राहील.

९) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे ही शुध्दीपत्रक क्र. १ व २ नुसार अद्यावत करणे आवश्यक राहील अन्यथा निविदा अस्विकृत केली जाईल .

१०) सदरील निविदा भरतांना निविदा धारकाने ऑनलाईन भरलेल्या कोणत्याही रकमेस बाजार समिती सोईनुसार परत करेल सदरील रकमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही.

११) निविदा फॉर्म फी ही विना परतावा असेल.

१२) कोणत्याही कारणास्तव निविदा नाकारल्यास कोणत्याही प्रकारचा दावा किंवा तक्रार चालणार नाही.

१३) सदरील शुध्दीपत्रक निविदा धारकाच्या सही व शिक्यांसह सदरील निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये अपलोड करणे बंधनकारक राहील अन्यथा निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

वरील प्रमाणे निविदे करीता ऑनलाईन प्रकाशित केलेल्या दोनही शुध्दीपत्रकातील नियम व अटी मी काळजीपुर्वक वाचल्या असुन सदरील अटींची पुर्तता करुनच मी निविदा भरत आहे जर शुध्दीपत्रकानुसार कोणत्याही प्रकारची पुर्तता माझ्याकडुन न झाल्यास व माझी निविदा नाकारली गेल्यास माझी कोणतीही तक्रार नसेल. व या बाबत कृषि उत्पन्न बाजार समिती, संगमनेर यांचा अंतिम निर्णय मला मान्य राहील मी त्यास सहमत असेल.

साक्षीदार नाव =================

सही .

निविदाधारकाची सही व शिक्का

(सदरील शुध्दीपत्रक रु. १० चे कोर्ट फी स्टॅप चिटकवुन सही करुन अपलोड करावे)